आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २८१ वा ● बुधवार दि. २७ मार्च २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## हत्तीरोग दुरीकरण मोहीमचे नारवट येथे जिल्हास्तरीय उद्धाटन

भोकर :- राष्ट्रीय हत्तीरोग दुरीकरण मोहीम नांदेड जिल्ह्यातील दहा तालुक्यात किनवट, माहूर, हिमायतनगर, हदगाव, भोकर, कंधार,नायगांव, बिलोली, देगलूर, मुखेड तालुक्यातील गावामध्ये दि.२६ मार्च ते ५ एपिल २०२४ या कालावधीत मोहिम राबविण्यात येणार आहे. नांदेड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल मॅडम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बालाजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार नांदेड जिल्ह्यातील आज दहा तालुक्यातील गावामध्ये बुथवर वयोमानानुसार डिईसी गोळ्या व अलबेंडाझॉल गोळ्या खाऊ घालण्यात आले. जिल्हास्तरीय उद्धाटन मौजे नारवट तालुका भोकर येथील शाळेत विद्यार्थी, सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी समक्ष गोळ्या खाऊन मोहिमची सुरुवात करण्यात आली.



## वंचित बहुजन आघाडी शहर शाखेच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

भोकर- इस्लाम धर्मियांचा अत्यंत पवित्र



समजला जाणारा रमजान महिना सुरू झाला असून इस्लाम धर्मीय रोजे उपवास (रोजा) धरला जातो दरम्यान संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास उपवास (रोजा) सोडण्यात येतो वंचित बहुजन आघाडी शहर शाखेचे शहर अध्यक्ष शेख रहिम यांच्या वतिने दि २३ मार्च रोजी समता नगर येथील मदरसा अक्सा येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.इफ्तार पार्टीला बहुजन आघाडीचे उत्तर जिल्हा अध्यक्ष राजेश्र्वर हत्तीअंबिरे, महासचिव लोटे सर ,भोकर तालुका अध्यक्ष दिलीप राव ,माणिक जाधव, भिम टायगर सेनेचे जिल्हा अध्यक्ष मिलिंद गायकवाड, पालमकर, ज्ञानू चव्हाण, सोहम रावसह आदि यांची बहुजन आघाडीचे कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी परिसरातील असंख्य मुस्लिम बांधव रोजदार उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष सय्यद मुस्ताक,फारूक भाई,पाशाभाई, शादुल भाई आदींनी परिश्रम घेतले.

## पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडाराचे व्यवहार २७ ते ३१ मार्च दरम्यान राहणार बंद

लातूर, f(जिमाका) : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या विभागीय भंडारामधील पुस्तके व कागदाची वार्षिक प्रत्यक्ष साठा मोजणी होणार असल्याने २७ मार्च ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत मंडळाची गोरेगाव, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिक, कोल्हापूर, पनवेल व अमरावती येथील आवक-जावक, विक्री इत्यादी सर्व व्यवहार बंदर राहणार असल्याचे पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक कृष्णकुमार पाटील यांनी कळविले आहे.

## सेवा समर्पण परिवाराचे संदिप काळे आणि डॉ.अभिजीत सोनवणे यांना राज्यस्तरीय पुरस्कार पुरस्कार जाहीर

भोकर- सेवा समर्पण परिवारच्या वतीने




भोकर तालुक्यामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात गेल्या ४ वर्षापासून काम करतात ५ व्या वर्धापन दिनानिमीत्त कार्यक्रमाची भव्य विविध कार्यक्रम आयोजीत केली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत सेवा समर्पण चे अध्यक्ष राजेश्र्वररेड्डी लोकावाड ,सचिव विठ्ठल फुलारी यांनी माहिती दिली या वेळी डॉ रामेश्र्वर भाले , दिगांबर देशमुख , बालाजी काळवणे ,उत्तम जाधव ,रवि देशमुख आदि उपास्थीत होते

सेवा समर्पण परिवारच्या ५ व्या वर्धापन दिनानिमीत्त दिनांक २९ मार्च २०२४ रोजी नागापुर ता. भोकर येथे नेत्ररोग शिबीर होणार आहे. दिनांक ३० मार्च २०२४ सकाळी १०.०० वाजता माऊली मंगल कार्यालय किनवट रोड, भोकर येथे महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबीराचे उद्घाटन तहसिलदार मा. सुरेश घोळवे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य पंजाब चव्हाण, प्राचार्य संजय देशमुख, मुख्याधिकारी मारोती जगताप यांची उपस्थित राहणार आहे. दिनांक ३१ मार्च रोजी माऊली मंगल कार्यालय, किनवट रोड, भोकर येथे सकाळी ११.३० वाजता सेवा समर्पण परिवारच्या वतीने सकाळ समुहाचे संपादक तथा व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक संदिप काळे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता सेवा समर्पण पुरस्कार तर सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभिजीत सोनवणे यांना राज्यस्तरीय समाजसेवा सेवा समर्पण पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारचे स्वरूप रोख ११,०००/- , मानपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे. या पुरस्कार सोहळा ज्येष्ठ साहित्यिक दत्ता भगत, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अव्वर सचिव राजेंद्र खंदारे, उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी, अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. खंडेराव धरणे यांचा प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे




## थकीत कराच्या वसुलीसाठी मालमत्तांना ठोकले सील मनपाची कारवाई, नागरिकांनी मालमत्ता कर लवकरात लवकर भरण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी: मालमत्ता कर थकीत असणाऱ्या दोन मालमत्तांना मनपाच्या पथकाने मंगळवारी (दि.२६ ) सील ठोकले. वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा केला जात नसल्याने पालिकेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.**

मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कर लवकरात लवकर भरणा करावा अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला.

लातूर एमआयडीसी परिसरातील धीरज टाइल्स यांच्याकडे २३ लाख ४४ हजार ६७१ रुपये थकबाकी होती.तसेच पॅनिका एनर्जी यांच्याकडेही मालमत्ता करापोटी ३१ लाख रुपये कर थकलेला होता.या दोन्ही मालमत्तांना मंगळवारी मनपाच्या वतीने सील ठोकण्यात आले.

मनपा उपायुक्त शुभम क्यातमवार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.कर अधिक्षक सतीश टेंकाळे मनपाचे पथक प्रमुख समाधान सूर्यवंशी,जे.एम.ताकपिरे, सहाय्यक




पथक प्रमुख चंद्रकांत बावगे,कर निरीक्षक प्रदीप जोगदंड, वसुली लिपिक संतोष फिसके, कुरकुट यांच्या पथकाने ही कारवाई करण्यात आली.

एमआयडीसी परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर तसेच शहराच्या इतर भागात ज्या नागरिकांचा मालमत्ता कर थकलेला आहे अशा मालमत्ता धारकांनी आपल्याकडील कराची थकबाकी दिनांक ३१ मार्च पूर्वी मनपाकडे जमा करून व्याज माफी योजनेचा लाभ घ्यावा. वेळेच्या आत मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला नाही तर थकीत मालमत्ता धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल,असा इशाराही मनपाकडून देण्यात आला आहे.

## सिद्धेश्वर यात्रेतून पत्रकाराची चोरट्याने पळवली मोटरसायकल, लातूर पोलीस अधीक्षक घेईनात दाद, सामान्य जनतेचे होणार काय?

लातूर प्रतिनिधी, : सिद्धेश्र्वर यात्रेत बातमीसाठी गेलो असता या यात्रेच्या पाठीमागील बाजूस गिरीनगर या भागात हिरो होंडा कंपनीची फॅशन प्रो लाल कलरची मोटर सायकल ज्याचा नंबर MH २५. AF १४७७ गाडी रोड साईडच्या बोळामध्ये पार्किंग साठी लावले असता बुधवार दि. २० मार्च च्या संध्याकाळी ११ वाजून २० मिनिटाला आलो असता २५ ते ३० मिनिटांमध्येच बातमी घेऊन वापस आलो या वेळी रात्रीचे १०:२० मिनिटाला मी लावलेल्या गाडी पार्किंग कडे पाहिले असता माझी मोटर सायकल जागेवर मिळून आली नाही. असे पत्रकार तथा तक्रारदार नितीन चालक यानी पोलीस अधिक्षक यांना दिलेल्या तक्रारी अर्जात नोंद केले आहे.

दैनिक मराठवाडा केसरी चे पत्रकार नितीन चालक यांची टू व्हिलर मोटार सायकल सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर च्या यात्रेतून अज्ञात चोराने चोरून नेली चोरीस गेलेल्या एम एच २५ ए एफ १४ ७७ मोटरसायकलच्या संदर्भामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात मा.पोलीस अधीक्षकांना लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघ मुंबई पत्रकार संघाचे मोठे शिष्टमंडळ भेटून मोटरसायकल चोरीस गेलेल्या संदर्भात माहिती देण्यासाठी व



चोरीस गेलेली मोटरसायकल तात्काळ मिळवून द्यावी व चोरास तात्काळ अटक करावी अशी मागणी घेऊन शुक्रवार दि. २२ तारखेला दुपारी ३ वाजता गेले असता साडेतीन तास म्हणजेच ६:३० वाजेपर्यंत पोलीस अधीक्षक कक्षा बाहेर बसवले व आलेल्या पत्रकारांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले साडेतीन तास वेळ होऊनही मा. पोलीस अधीक्षकांनी आलेल्या पत्रकारांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली नाही व ताटकळत उभा केले तसेच कोणत्याही प्रकारची विचारपूस किंवा चौकशी करण्याची दक्षता घेतली नाही.

लातूर विवेकानंद पोलीस चौकीचाही काही असाच अनुभव पत्रकारांना आला आज, उद्या, परवा करण्यात वेळ वाया घालवला लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघ मुंबई सिस्टमंडळातील आलेल्या सर्व पत्रकारांसोबत अशी निंदनीय व हेटाळणी आलेल्या अर्जदाराची होत असलेली कुचंबना व अतिशय वाईट अशी वागणूक जर लातूर जिल्ह्याचे पोलीस करीत असतील तर लातूरातील सामान्य जनतेसोबत कशी, काय वागणूक देत असतील, आलेल्या नागरिकांची इतंभूत माहिती न घेता त्यांना ताटकळत पोलीस स्टेशन व पोलीस अधीक्षक कार्यालयात उभे करणे आरोपीपेक्षा तक्रारदारच आरोपी असल्यासारखी वागणूक देत असल्याची तसेच पत्रकारांना न्याय मिळत नसेल तर नागरिकांचे काय हाल होतील अशी चर्चा लातूर जिल्ह्यातून नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व नागरिकांतून चर्चा होताना पाहायला दिसत आहे.

लातूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात देखील सामान्याचे काम होत नाही तर लातूरच्या जनतेने कोणाकडे पहायचे आणि कोणाकडे न्याय मागायचा नागरिकांना भेटण्यासाठी वेळ दिला असताना तो वेळ डावलने व नागरिकांना ताटकळत कार्यालयाबाहेर बसवणे हे लोकसेवकाचे वर्तन नसून नागरिकांची हेळसांड जाणून बुजून करत असल्याची अशी चर्चा लातूरातील जनतेतून सर्वत्र चालू आहे.

## जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॅलीद्वारे जनजागृती

लातूर, : जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली २४ मार्च २०२४ रोजी जागतिक क्षयरोग दिनानिमित जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रदिप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे एच.व्ही. यांच्या हस्ते हिरवा झेंडी दाखवून करण्यात आले.

रॅलीसाठी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.प्रविण ढगे, डॉ.विद्या गुरुडे, डॉ.पाठक



एस.जी., जिल्हा क्षयरोग अधिकारी श्रीमती डॉ. एस.एन.तांबारे, डॉ.मोनिका पाटील, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. महेश पाटील, डॉ.अनंत कलमे, डॉ .हर्षवर्धन राऊत, वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपनर डी.के., जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.बाळासाहेब जाधव यावेळी उपस्थित होते.

या रॅलीमध्ये शहरातील विविध भागातून जनजागृती करण्यात आली आहे. महात्मा गांधी चौक, बस स्थानक, गंज गोलाईमार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे रॅलीची सांगता झाली. बाभळगाव नर्सिंग कॉलेज व विलासराव देशमुख नर्सिंग कॉलेज येथील विद्यार्थी रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

## लातूरच्या विकासासाठी हक्काचा वाढपी दिल्लीत पाठवूया

लातूर : लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, विमानतळ, पाणी असे प्रश्न सरकारदरबारी अडकले आहेत. तर दुसरीकडे आयआयटी, आयआयएम सारख्या संस्था लातूरात उभ्या राहिल्या पाहिजेत. तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे. अशा विषयांना वाचा फोडून त्याची सोडवणूक करण्यासाठी आपल्या विचाराचे खासदार संसदेत असले पाहिजेत. डॉ. शिवाजी काळगे यांच्या रूपाने आपण आपल्या हक्काचा वाढपी दिल्लीत पाठवून लातूरसाठी अधिकाधिक विकासकामे खेचून आणू, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले.

लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ग्रामस्थ, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या समवेत संवाद बैठका आयोजिण्यात आल्या आहेत. याची सुरुवात मंगळवारी (ता. २६) करण्यात आली. पानगाव, कोष्टगाव, कारेपूर, खरोळा या गावांत



बैठका घेण्यात आल्या. तर घनसरगाव, मुरढव, पाथरवाडी, दिवेगाव, रामवाडी (ख) आदी गावांना भेटी देण्यात आल्या.

यावेळी संवाद साधताना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या विधानाची आठवण करू दिली. 'वाढपी हा आपल्या हक्काचा असला पाहिजे.' असे विलासराव देशमुख सांगत असत. त्या दृष्टीने आपण कामाला लागून लातूरची जागा मोठ्या मताधिक्याने विजयी करून दाखवू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ही केवळ निवडणूक नसून ही लढाई आहे, वाढत्या बेरोजगारी विरोधात, वाढत्या महागाई विरोधात. लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठीचा हा लढा आहे. त्यामुळे सर्वांनी सजग रहावे, असे सांगून आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, शेतकरी, महिला, विद्यार्थी, युवक यांच्यासाठी केंद्र सरकारने गेल्या १० वर्षांत काहीही केले नाही. काँग्रेसच्याच जुन्या योजनांची नावे बदलून त्या नव्याने राबवल्या. एम. एस. स्वामिनाथन यांना भारतरत्न दिले; पण त्यांच्या सूचनांकडे पाठ फिरवली. शेतकऱ्यांचे म्हणणेही ऐकून घेतले नाही. त्यामुळे जनता सरकारच्या कारभाराला वैतागली आहे. काँग्रेस सर्वांना बरोबर घेवून जाणारा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेसच आजच्या अडचणीच्या काळात सामान्यांना न्याय देईल, असा जनतेला ठाम विश्र्वास वाटत आहे. म्हणून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येयधोरणे, पक्षाचे काम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहनही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केले.

## भारतीय बौद्ध महासभा माजलगाव शाखेच्या वतीने फाल्गुण पौर्णिमा साजरी

माजलगाव (प्रतीनिधी) : भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखेच्या वतीने सांची बुद्ध विहार डॉ.आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे वर्षभरातील सर्व पौर्णिमा तसेच सर्व महापुरुषांच्या जयंत्या विविध उपक्रमाने साजरी केल्या जातात.याचाच एक भाग म्हणून दि.२४ मार्च २०२४ वार रविवार रोजी फाल्गुण पौर्णिमा साजरी करण्यात आली.त्याच निमित्तान मागील महिन्यात साजरा करण्यात आलेल्या त्यागमुर्ती माता रमाई व बुद्धमुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब बैठक आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला उपाध्यक्षा आद.लिलाताई उजगरे या होत्या.या कर्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव बीड पुर्व आद.शामभाऊ वाघमारे,भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला सरचिटणीस शोभाताई भोजने, जिल्हा पर्यटन सचिव आद.के.व्ही.साळवे सर वंचित बहुजन आघाडी चे नेते आद.अंकुश जाधव,आद.भारत तांगडे,आद.धम्मानंद साळवे , शेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे, पत्रकार सुहास बोराडे,बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे,क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर,नाथाजी घडसे,बहुजन समाज पार्टी चे महासचिव हरिभाऊ साळवे, इंजि.नवनाथ गायकवाड,अश्रिवन टाकणखार, दिनेश निसर्गंध,बळीराम सिरसट,माजीसैनिक शंकर वाघमारे सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी.पी.पोटभरे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे ता.संस्कार उपाध्यक्ष डॉ.भागवत साळवे यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी.पी.वाघमारे यांनी मानले.या ठिकाणी डॉ.भागवत साळवे यांनी त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती व बुद्ध मुर्ती शुशोभिकरण कामाचा जमा खर्च हिशोब अहवाल सर्वांसमोर वाचुन दाखवला.यावर विचार विनिमय करुन सर्व उपस्थित पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका यांच्या समोर हिशोब प्रमाणित करण्यात आला.के.व्ही.साळवे सर यांनी फाल्गुण पोर्णिमा चे महत्व पटवुन दिले. तसेच शिंदे,वाघमारे,बोराडे यांचेही समयोचित भाषणं झाली.बौद्ध धम्म ग्रामीण भागापर्यंत पोहचवण्याच काम भारतीय बौद्ध महासभा करत आहे व पुढेही भारतीय बौद्धमहासभेलाच करावे लागेल असे प्रतिपादन आद लिलाताई उजगरे यांनी अध्यक्षिय समारोपात केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या मंदाताई साळवे,विशाखाताई वाघमारे,मायाताई स्वामी,प्रकाश साळवे,दयानंद साळवे,भानूदास साळवे,मोहन काकडे,भगवान डोंगरे,बाबासाहेब घनघाव,रेखाताई भारसकर, शारदाताई तांगडे,अनुराधाताई साळवे,नितिन डोंगरे,भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधीकारी यांनी परिश्रम घेतले.

## अवैध पाणी उपसा रोखण्याची कार्यवाही गतिमान करावी- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### जिल्ह्यातील पाणी टंचाईचा आढावा

### अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी पथके स्थापन

लातूर, : जिल्ह्यातील जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे या पाण्याचा अवैधरित्या उपसा होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी येथे दिल्या. जिल्ह्यातील पाणी टंचाईविषयक आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांच्यासह महानगरपालिका, पशुसंवर्धन विभाग, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीला उपस्थिती होती.

जिल्ह्यात पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रकल्पाशी संबंधित जलसंपदा अथवा जलसंधारण विभागाचे शाखा अभियंता, महावितरणचे शाखा अभियंता, संबंधित महसूल मंडळ अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक यांची पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकांनी गतिमान कार्यवाही करून जिल्ह्यात होणारा अवैध पाणी उपसा रोखावा, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केल्या. उपलब्ध पाणीसाठा, चारा, तसेच महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांचाही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी आढावा घेतला.

### अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी भरारी पथकांमार्फत कारवाई

जलाशयांमध्ये आरक्षित करण्यात आलेल्या पाणीसाठ्याचा उपसा करणाऱ्यांवर भरारी पथकांमार्फत कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत ८६ विद्युतपंप जप्त करण्यात आले आहेत. तसेच १३८ विद्युत स्टार्टर, १०९ वायर बंडल जप्त करण्यात आले आहेत. तसेच ८७५ वीज कनेक्शन तोडण्यात आले असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.

### नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा : जिल्हाधिकारी

जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून पिण्यासाठी आरक्षित केलेल्या पाण्याचा अवैध उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहे. त्यामुळे कोणीही पाण्याचा अवैध पद्धतीने उपसा करू नये. तसेच संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – महायुती–महाविकास आघाडीच्या लातूर लोकसभा राखीव मतदारसंघातील उमेदवाराच्या प्रचारानिमित्ताने मतदारत संभ्रम निर्माण झाल्याचीच कुजबूज अधिक होताना दिसते आहे. काय गौडबंगाल आहे हेच कळत नाही. डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे, लातूर लोकसभा मतदार संघातील वादी–प्रतिवादी उमेदवार हे जनसामान्यातील नाहीतच. ते पैशाच्या जोरावरच लोकसभा निवडणूक लढवीत आहेत. त्याच्या कार्याचा–जनसंपर्काचा कसलाच आधार नाही केवळ जातीय राजकारणातून ते महायुती–महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत त्याचा कार्यकर्त्यांचा आधार नाहीच. तू कशाला चिंतीत होतो आहेस.

एक – अहो, असा गैरसमज पसरवु नका कारण मागच्या वेळीच विद्यमान खासदार सुधाकर शृंगारे हे मताधिक्याने भाजपच्या तिकिटावर निवडून आले आहेत. आजघडीलाही शृंगारे हे भाजपा महायुतीचे उमेदवार आहेत तर महाविकास आघाडीचे काँग्रेस उमेदवार शिवाजी काळगे हे वैद्यकीय क्षेत्रातील असले तरी ते अनुसूचित जातीचे आहेत. हे त्यांना उमेदवारी मिळाल्यानंतर मतदारांना समजले असल्याने कोणास मतदान करावे अनुसूचित जातीचा खरा कोण आहे अशीच संभ्रमित कुजबूज होत असल्याने बोलतो आहे.

दुसरा – अरे, जातीय राजकारणात काँग्रेस–भाजपा हे एकाच माळेचे मनी आहेत. त्यामुळे आजवरच्या दगाबाजी राजकारणातून मतदार सावध झाले असल्याचे आज घडीला तर मतदाराचा कॉल अपेक्षाकडेच दिसतो आहे.

एक – अहो, असे तर काँग्रेसने बाहेरचा उमेदवार लादला होता पण आज घडीला भाजपा–काँग्रेसचे स्थानिक उमेदवार असल्याने लोक संपर्क पेक्षा देव–धर्म करूनच ते प्रचारात व्यस्त असल्याने काय होईल याची काळजी वाटते.

दुसरा – अरे, शृंगारे अधून– मधून लातूरकरांसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि खुर्ची स्थितीत पुतळ्यामुळे समोर आहेत पण निष्क्रियच आहेत तर डॉ. शिवाजी काळगे हे जातीय राजकीय नेत्याच्या सल्लामस्लीतून उभे आहेत. हे लक्षात ठेव.

# काय बोलता राव ?

मागील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने नवखा उमेदवार दिल्याने तात्कालीन जिल्हा परिषद सदस्य तथा मुंबईतील ठेकेदार असलेले मूळ अनुसूचित जातीचे उमेदवार भाजपचे विद्यमान खा. सुधाकर शृंगारे हे निवडून आलेले होते त्याच कारण भाजपा नव्हे तर दलित –मुस्लिम –बहुजन मतदारांचा त्यांना पाठिंबा होता ती मते पारंपारिक काँग्रेसचीच होती त्यामुळे श्रृंगारे विजयी झाले होते पण आज घडीला काँग्रेसचाच स्थानिक उमेदवार असल्याने शृंगारे अडचणीत आले आहेत अशीच कुजबूज प्रसारमाध्यमातून होताना दिसते आहे.

**काय बोलता राव,**

अरे, लातूर लोकसभा मतदार राखीव झाल्यापासून काँग्रेसला लोकसभेसाठी रबरी शिक्का पाहिजे होता. पण स्थानिक उमेदवार शिक्षित–सक्रिय राजकारणी असल्याने काँग्रेस नेतृत्वाने संधी दिली नाही, परंतु आजघडीला स्थानिक उमेदवार ते ही अनभिज्ञ अनुसूचित जातीचे असले तरी मराठा, दलित, मुस्लिम, बहुजनाच्या मताची बेरीज काँग्रेसकडे असल्याने डॉ. काळगे यांचाच विजय होणार असल्याची कुजबूज असून जुने आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते खा. शृंगारे यांचीशी अनुकूल नाहीत अशीच उलट सुलट कुजबूज होत असून पैशाच्या जोरावर ते आंबेडकरी चळवळीत कार्यकर्त्यांना जुमानत नसल्याने जुन्या कार्यकर्त्यांनी शृंगारे विरोधी पथक निर्माण करून त्यांची मुंबई त्यांना बहाल करण्याचे ठरविले असल्याची कुजबूज लातूर येथील डॉ. आंबेडकर चौकात होती मग बोला दाजीबा.

# सृष्टी ग्रीन क्लब निर्मिती विद्यापीठाचा स्तुत्य उपक्रम पर्यावरण तज्ञ सुपर्ण जगताप

लातूर : सध्या संपूर्ण विश्र्वामध्ये ग्लोबल वार्मिंगमुळे पर्यावरणामध्ये विविध समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या परिपत्रकान्वये प्रत्येक महाविद्यालयात ग्रीन क्लबची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृतीचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन पर्यावरण तज्ञ तथा सह्याद्री देवराई मराठवाडा विभागीय समन्वयक सुपर्ण जगताप यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील आय.क्यु.ए.सी., पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन केंद्र आणि सृष्टी ग्रीन क्लब द्वारा जागतिक जल दिनाचे औचित्य साधून जल जागृती सप्ताह अंतर्गत विस्तार व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. योगेश रेड्डी, ग्रीन क्लबचे मार्गदर्शक डॉ. बाळासाहेब गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

# प्रकाश आंबेडकर बोलतात तर...

## संपादकीय...

भारतीय राजकारण–सत्ताकारण, प्रामाणिकता, सभ्यता, लोकशाही, न्याय, हक्काचा लवलेशच संपुष्टात येतो आहे. लोकशाहीत निवडणुका हे प्रभावी साधन असताना याच लोकशाही साधनाची ऐशी तैशी करून हरेक राजकीय पक्ष हा सत्तेसाठी हापापलेला दिसतो आहे कारण भाजपा महायुती आणि भाजपाविरोधी इंडिया महाविकास आघाडी आमने– सामने असताना त्याच्यात मतदारसंघ निहाय उमेदवारी निश्र्चित होऊ शकत नाही कोणत्या आघाडीत कोणत्या आघाडीला–पक्ष–संघटनेला सामावून घ्यावे यावरही कलगीतुरा होताना दिसतो पण भारतीय लोकशाही वर हुकूमशाही लादूपाहणाऱ्या, एक पक्ष–एक नेता अशी क्लुतृप्ती आखणाऱ्या आणि स्वतःला पॉप; हिटलर बनण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या आजच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हट्टावासाठी मी, तू करणाऱ्या इंडियाला काय हवे आहे. हे एक अवघड कोडे असले तरी डोके ठिकाणावर ठेवून मतदारासमोर नेते कसे व कोणत्या मार्गाने जाणार आहेत या संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे नेते अँड. प्रकाश आंबेडकर हे स्पष्टपणे टी. व्ही चॅनल, पत्रकार परिषदेतून रोखठोक बोलत आहेत स्वतः ची भूमिका विशद करीत आहेत त्या व अशावेळी अँड. प्रकाश आंबेडकर बोलतात तर त्याबद्दल विचार करणे गरजेचे वाटते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे नेहमीच खऱ्या अर्थाने भारत देश हा २०१४ सालीचा स्वतंत्र झाला असे म्हणतात तोच धागा पकडून नरेंद्र मोदी यांनी १९४७ साली म. गांधी यांनी पाकला–जिना यांना ६० कोटी रुपये दिले असा आरोप करतात–तो करार कसा झाला त्यावेळी कोण होते याची कल्पनाही मोदी यांना माहीत नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हेडगेवार–गोळवणकर किंवा मोहन भागवत यांनी असे आरोप करावेत हे निंदणीय वाटते खरे–काय खोटे काय याची शहानिशा करायची असेल तसा..... दम असेल तर त्यांनी एका विचारपिठावर यावे असे आवाहनही अँड. प्रकाश आंबेडकर यांनी लोकसभा निवडणुकी संदर्भातील गोंधळावंर भाष्य करताना स्पष्ट केल्याने प्रकाश आंबेडकर यांच्या विचारातून मोदीविरोधी स्पष्ट केल्याने प्रकाश आंबेडकर यांच्या विचारातून मोदीविरोधी लढाई जिंकणे गरजेचे असल्याचीच चर्चा स्पष्ट होताना दिसते आहे.

लोकसभा निवडणुका, दलित– मुस्लिम–बहुजन–मराठा कार्ड या संदर्भात बोलताना अँड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच काँग्रेस ही मराठा कार्डाचा ध्वज हा म. गांधी यांनी दलित–मुस्लिम, बहुजनांच्या खांद्यावर दिला–घरोघरी लावला त्यातूनच स्वातंत्र्य मिळाले. त्याच काळात म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रा. शाहू महाराज यांनी जातीअंताच्या लढाईसह धर्मनिरपेक्षता–पुरोगामी विचाराची पेरणी केली म्हणून आज भारत आहे अशा जडणघडणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा भाजपा नव्हताच मग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे भारताच्या विकासाचे–भक्कम अर्थव्यवस्थेचे, भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वलील उदगार कशासाठी काढतात असा आरोप करून अँड. प्रकाश आंबेडकर यांनी सरकारी यंत्रणेकडून दहशत निर्माण करणे, भ्रष्टाचार–महागाई विरोधी बोलले तर देशद्रोही खटले दाखल करणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रकरणी चीनकडून मावेजा–पैसे घेतले नाहीत काय असा सवाल करून मोदीविरोधी एकत्रितपणे निवडणूक लढवून मोदीच्या रूपातील हिटलरशाही–पोपशाहीला मुठ माती देणे गरजेचे असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केल्याने यावर चर्चा होणे गरजेचे वाटते.

अँड. प्रकाश आंबेडकर म्हणतात की गेली दहा वर्षात मोदी सरकारने जनहिताची कामे नकारता केवळ विरोधीपक्षने त्यांना कोणत्यातरी संभाव्य आरोपात ईडीमार्फत खटले दाखल करून भाजपात ओढून घेतले पण कालपरवा दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांची अटक म्हणजे ते मुक्त असते तर मोदी सरकारचा भांडाफोड केले असते या भीतीपोटीच ईडीमार्फतची ही कारवाई आहे असे स्पष्ट करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची हुकूमशाही राजवट संपुष्टात आणायची असेल तर भाजपा– मोदी विरोधी पक्षांनी एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जावे लागेल पण मी की तू म्हणून आपसातच शिरजोर होण्याचा प्रयत्न झाला तर उद्याला नरेंद्र मोदी यांच्या रूपातून नवा हिटलर–पोप निर्माण होईल अशी भीती व्यक्त करून भाजपा–मोदी विरोधी तमाम पक्षाने त्यांना अँड. प्रकाश आंबेडकर यांनी एकत्रितपणे लोकसभा निवडणुकीत मोदीचा पराभव करणे हेच महत्त्वाचे धोरण ठेवावे ह्यानुषंगाने लढा द्यावा ही प्रकाश आंबेडकर यांची भावना रास्त वाटते अशी लोक भावना प्रकट होताना दिसते आहे.

# लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी, पोलिस यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनू नये.

निवडणूक आयोग आता निपक्षपाती राहिला नाही.तो संविधानाच्या चौकटीत स्वताचे अधिकार वापरण्यास असमर्थ असेल तर तो.हाता खालील इतर अधिकाऱ्यांनी निपक्षपाती काम करावे असे सांगण्याच्या लायकीचा तो नसणार आहे.त्यांनी माननीय टी.एन.शेषन यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.मुख्य निवडणूक आयुक्त काय करू शकतो हे देशाला दाखवून दिले पाहिजे. आजचे राजकीय नेते मनुवादी मानसिकतेचे असतील तर त्अयावर अंकुश ठेवण्धियाचे काम निवडणूक आयोगाचे आहे.अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर ते राज्यघटना,संविधानाची अंमलबजावणी होऊ देणार नाहीत.यांचा अनुभव आता शेतकरी,कामगार,सेवानिवृत सैनिक,सुशिक्षित तरुण,बेरोजगार तरुण,जिल्हा परिषद शिक्षक,विना अनुदानीत बी एड,झालेले शिक्षक,आरोग्य सेवा देणारे डॉक्टर,कामगार,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर,क्रीडा क्षेत्रातील खेळाडू सर्वानीच भारतीय नागरिक म्हणून अनुभव घेतला असेल यात शंका नाही.त्यामुळे निपक्षपाती निवडणुका हा एका व्यक्तीचा नव्हे तर देशाचा प्रश्न आहे.त्यासाठी लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर?.ते देशाच्या नागरिक मतदारांचा आणि सविधानाच्या विश्र्वासाचा खून करण्यास जबाबदार असणार आहेत. करिता अधिकारी कर्मचारी यांनी कोणत्याही दडपणाखाली आणि प्रलोबनाला बळी न पडता कर्तव्य पार पडावे.लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलिस यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनू नये.

आज भारतीय हिंदू मोदीच्या चरणी अर्पन झाला आहे.हा कमालीचा स्थितिशील असणारा,टिकून राहण्याचा लोकविलक्षण चिवटपणा,दाखविणारा आणि लोकसंख्येत ८५ टक्के असणारा हिंदुसमाज मनाने आधुनिक व गतिमान कसा करावा,हा आज स्वताला सेक्युलॅरिझम समजणाऱ्या लोकां समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे.हा दीर्घकाळ चालणारा खरा अटीतटीचा लढा आहे. एवढा चिवट असलेला हिंदुसमाज मनाने कमालीचा असहिष्णू व तितकाच कमालीचा क्रूर असूनही उदारमतवादी व सहिष्णू म्हणून ओळखला जातो. तोंडाने सर्वधर्मी समानता आणि आत्म्याचे अद्वैत सांगणाऱ्या या समाजाने दोन हजार वर्षे काही कोटी शूद्र,अति शूद्र आदिवासींना संस्कृतीच्या कक्षेच्या आत गुलाम करून टाकले होते.स्त्रियांची गुलामी हा पुन्हा वेगळाच भाग आहे. लक्षवेधी रुपये खर्चून मीनाक्षीसुंदरम आणि वेरूळची देवालये निर्माण करणाऱ्यांनी समाजात वरिष्ठ वर्गाच्या उपभोगासाठी दासी,बटकी आणि वेश्या मिळून जगातील सर्वात मोठा समूह निर्माण केला होता ! उदार हिंदूसंस्कृतीत इंग्रजांनी कायद्याने बंद करीपर्यंत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत माणसांच्या खरेदीविक्रीचे बाजार गुरांच्या आठवडी बाजाराप्रमाणे भरत होते.तसेच आता शहराच्या नाक्या नाक्यावर चौकात श्रम विकणारे बाजार भरत असतात.एकेक पुण्यश्र्लोक राजा केवळ धर्मप्रेमाखातर पाचपाचशे मुली देवळांना देवदासी म्हणून नजर करीत असे ! शत्रूंची बायका–मुले पकडून गुलाम करावी, ही प्रथाही भारतात होती.हिंदुसमाजात हे सर्व काही होते,याबद्दल मी हिंदुसमाजाला फार दोषी धरत नाही; कारण हेच चित्र मध्ययुगातील ख्रिश्र्चनांचे व मुसलमानांचे आहे.मी आपल्याच धर्मातील मेंदूतील ब्लॅक (इश्रेलज्ञ) काढण्याचा प्राथमिक प्रयत्न करीत आहे.तो या निमित्याने लिहून सांगण्याचा प्रयत्न करतो.असो...

भारतात केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल,तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे.याच अर्थ हा की,क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णतः दूर सारला पाहिजे.याचा अर्थ कायदेभंग,असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता,त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते.परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारु तेवढे ते आपल्या हिताचे होईल.असे आत्मविश्र्वासाने बाबासाहेबांनी शेवटच्या भाषणात सांगितले होते.

बाबासाहेब पुढे असे सांगतात दुसरी महत्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये.तसेच त्याच्यावर इतका विश्र्वास ठेवू नये,की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उदध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत.आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही, कोणतीही स्त्री स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे,कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो, किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही,इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी,की केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल, तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य,समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय.निपक्षपाती निवडणुका हे लोकशाही देशातील सर्वात मोठी यंत्रणा आहे तीच जर भ्रष्ट झाली तर देशाचा सत्यानाश होण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक नसावे.याची दक्षता मुख्य निवडणूक आयुक्तांनी घेतली पाहिजे.

आजच्या परिस्थितीत देशातील समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही.समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल.बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वभाविकरित्या अस्तित्वात राहणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस यंत्रणेची गरज भासेल.भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णतः अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निष्कृष्ट अवस्थेत असतात.आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काही लोका जवळ गडगंज संपत्ती आहे,तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात.राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत.आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र,सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे,प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण ई व्ही एम मशीन द्वारे नाकारत राहणार असाल तर निवडणुका घेण्याला काहीच अर्थ राहणार नाही.आपण जर प्रत्येक निवडणुकीत मतदाराच्या मताला नाकारत राहिलो,तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे परिणाम भोगावे लागत आहेत ते सर्व शोषित घटक अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाही संरचना उदध्वस्त करतील.हे बाबासाहेबांचे शब्द आज देशात जसेचे तसेच अंमलात येताना दिसत आहेत.लोकशाहीने लोकांच्या मतदानाने लोकांसाठी लोकउपयोगी निर्णय घेण्याचे अधिकार बहाल केले.ते लोकप्रतिनिधी भांडवलदाराच्या रक्षणा करीता गोरगरीबाचा बळी देत आहे. म्हणजे लोकशाही ने दिलेल्या संविधाना नुसार नाही. तर हुकूमशाहीच्या मार्गाने चाललेले मार्गक्रम आहे.मग निपक्षपाती निवडणुका कशा होतील.लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलिस अधिकारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर?.

सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल.त्यांनतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचा आम्ही गांभीर्याने विचार करु शकू.या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे.अमेरिकेत जातीची समस्या नाही.भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत.पहिली गोष्ट त्या समाजजीवनात विभागणी करतात.त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती–जातीमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वा शिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल.स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी यांनी याचा विसर पडू देता कामा नये.

देशातील या स्वातंत्र्यामुळे,कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इतरांना दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले, तर त्यासाठी पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी यांच्या शिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही.लोकसभा निवडणुकीत अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे.आपले लोकसुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत.लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येऊ लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे.आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत, की जेणेकरुन लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील.

यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बले ठरता कामा नये. पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी यांच्या शिवाय इतर कुणालाही निवडणूक यंत्रणेत काम करण्याचा अधिकार नसतो. पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकाऱ्यांची यांना खर्या अर्थाने देशाची सेवा करण्याची संधी असते. म्हणूनच लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलीस अधिकारी यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनून काम करू नये ते स्वतासाठी आणि देशासाठी घातक ठरणार आहे.प्रशासकीय अधिकारी कर्मचारी पोलिस अधिकारी ही एकूण सर्व यंत्रणा भारतात लोकशाही असल्यामुळे संविधानाच्या चौकटीत तयार झाली आहे. मनुवादी विचारांची समाज व्यवस्था हे मान्य करत नाही.हे सर्वानी लक्षात ठेवावे.

**सागर रामभाऊ तायडे, भांडूप मुंबई**
**-९९२०४०३८५९,**

# भारत आनंदी का नाही ?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक अहवाल प्रसिद्ध केला जातो. २०१२ पासून हा अहवाल प्रसिद्ध केला जातो. यावर्षी या अहवालाची तेरावी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली. ही यादी तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या गटाकडून विशिष्ट पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. भ्रष्टाचाराविषयी नागरिकांचे मत, आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचं स्वातंत्र्य, आयुर्मान, सामाजिक पाठिंबा, जीडीपी, राहण्याच्या ठिकाणाविषयीचे समाधान अशा काही बाबींचं मूल्यमापन ही यादी तयार करताना केलं जातं. दरवर्षीची यादी तयार करण्यासाठी प्रामुख्याने पहिल्या मागील तीन वर्षामधील परिस्थितीचा आढावा घेतला जातो. या निकषांवर देशांना ० ते १० या दरम्यान मूल्यांकन दिलं जातं. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग सहाव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. फिनलँडच्या पाठोपाठ डेन्मार्क, आईसलँड, स्वीडन, इस्त्राईल, नेदरलँड, नॉर्वे, लक्झेमबर्ग, स्वित्झर्लंडआणि ऑस्ट्रेलिया या नऊ देशांचा क्रम लागतो. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४६ देशांच्या यादीत भारत १२६ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका यासारख्या देशात सध्या मोठ्या प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत त्याचवेळी भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग सहाव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्र्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्र्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्र्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

**धुलिवंदन ..**

हताशनी दुजे दिनी
धुळवडी धुलिवंदन
राख लावी कपाळा
पाविव्य टिळा चंदन
शिवराळी भाषा पुरे
करे मुग्ध अभिनंदन
होळी जाळी दुर्गुणां
सोडा सारे आक्रंदन
प्रत्येक सणसंस्कृती
करे समाज उद्बोधन
गुण जाणावे सणांचे
सकल पूर्ण संशोधन
खूप देते माते आम्हां
धरणीतवअभिवादन
पर्यावरण करी जतन
उच्छृंखले आच्छादन
रंगपंचमीचाविपर्यास
रे –हास जलसंसाधन
मौज मस्तीस्तव मात्र
वाया अपर्याप्तसाधन
थेंबा थेंबाला व्याकूळ
मग हो आरण्य रूदन
बदलेआता आमुलाग्र
करी अंधप्रवृत्ती मर्दन
कोरडी धुळवड योग्य
स्वतांस करी आवेदन
कालानुरूपी अवधान
माणूसपणाचे निवेदन

२)
**रंग ..**

राजकारणी चालते
रोजची रंग पंचमी
भाग घेई हिरीशिरी
कुणीचं नसते कमी
शब्दांची रंग पंचमी
बोलाया खुमखुमी
कोण बोलेल काय
कसली नाही हमी
होळीचे निमीत्ताने
संधी मिळते नामी
भडास काढे कुणी
वेळ असते हरामी
डोके मागे दुजांचे
प्रवक्ताअसतो डमी
आजच्या दिवसास
चाले सारी बेशर्मी
आतले येते बाहेर
सुशांत दबली उर्मी
मन निर्मळ कराया
थंड करायची गर्मी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६..**

## राहुल गांधींचे भविष्य अंधारात, २०२६ पर्यंत आसाममध्ये नसणार काँग्रेस

नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक २०२४च्या पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी काही दिवसच शिल्लक आहेत. आसाममध्ये निवडणुकीआधी प्रचारात गुंतलेले राजकीय पक्ष आपल्या विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल करत आहेत. यातच आता आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी काँग्रेस पक्षाचे खासदार राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. राहुल गांधींचे भविष्य अंधारात असून २०२६ पर्यंत काँग्रेस राहणार नाही असे त्यांनी म्हटले आहे.

## तुम्हीही एकाच जागी खूप काळ गाडी लावून ठेवत असाल तर होऊ शकते मोठे नुकसान,घ्या जाणून

तुम्ही तुमची कार किंवा गाडी एकाच जागी लावत असाल तर ही बातमी तुमच्याकरता उपयुक्त आहे. खरं तर, कार एका जागी जास्त वेळ उभी राहिल्यास तुमच्या खिशाला भारी पडू शकते, आम्ही असे म्हणत आहोत कारण जास्त वेळ पार्किंग केल्यामुळे तुमच्या कारचे टायर आणि इतर भाग देखील पूर्णपणे खराब होऊ शकतात. तुम्हालाही तुमचे वाहन अनेक दिवस एकाच ठिकाणी पार्क करावे लागत असेल, तर आज आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगणार आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही मोठे नुकसान टाळू शकता. १. वाहन बराच वेळ एकाच जागी उभे राहिल्यास बॅटरी डिस्चार्ज होते. तसेच बॅटरीची क्षमता झपाट्याने कमी होऊ लागते. हे टाळण्यासाठी, किमान १० दिवसांतून एकदा वाहन सुरू करा ज्यामुळे बॅटरी आणि इंजिन दोन्ही चांगले टिकेल. २. वाहन एकाच ठिकाणी जास्त वेळ उभे राहिल्यास त्याचे टायर खराब होते. हे टाळण्यासाठी किमान १५ दिवसात वाहन बाहेर घेऊन जा. यामुळे गाडीचे ब्रेक, क्लच, बॅटरी आणि इंजिन खराब होणार नाही. ३. कारच्या इंजिनच्या भागांची जेवढी काळजी घ्यावी, तेवढीच त्याच्या बाह्य भागाचीही देखभाल केली पाहिजे. तुमच्याकडे कोणत्याही कंपनीची कोणतीही कार असली, जेथे लोखंड आहे, तेथे नेहमी गंज लागण्याची शक्यता असते. ४. वाहन बराच वेळ उभे असले तरीही इंधन टाकी भरलेली ठेवा. तसेच, जर तुम्हाला कधी आपत्कालीन परिस्थितीत वाहनाची गरज भासली तर तुमच्या वाहनात पुरेसे इंधन असेल. ५. तुमची कार नेहमी चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी, एका गोष्टीकडे विशेष लक्ष द्या की कार जास्त काळ उभी राहू नये. असे केल्याने, कारचे पार्टस, टायर्स, इंजिन, बॅटरी इत्यादी गोष्टी जॅम होऊ लागतात आणि त्यांच्यामधला गुळगुळीतपणा संपू लागतो. ज्यामुळे कार लवकर जुनी होते. काही वेळा वाहनांच्या पेट्रोलच्या टाक्याही सुकतात. यामुळे त्याचा देखभाल खर्च वाढतो. हे सर्व टाळण्यासाठी, जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा कार थोडी चालवा जेणेकरून त्याचे भाग नेहमी फिट राहतील. तसेच, हे लक्षात ठेवा की जर तुम्ही बराच काळ बाहेर कुठेतरी जात असाल, तर घराच्या बाहेर मोकळ्या जागेत कार उभी करू नका, त्यामुळे गाडी लवकर खराब होईल.

## उपदेशकथा
### ईश्वर म्हणजे काय?

स्वामी विवेकानंद मद्रासमध्ये असताना त्यांना भेटण्यासाठी काही महाविद्यालयीन विद्यार्थी आले. दोघा–चौघांनी मिळून वादविवाद करताना स्वामीजींना अडचणीत आणावे आणि त्यांची फजिती करावी असा त्यांचा हेतू होता. त्यांच्यापैकी एकाने स्वामीजींना विचारले, 'स्वामीजी, ईश्वर म्हणजे काय?' या प्रश्नाने त्यांचा हेतू स्वामीजींच्या लक्षात आला. त्यांनी त्या विद्यार्थ्याला लगेच उलट प्रश्न विचारला, ''मित्रा, ऊर्जा म्हणजे काय हे तू सांगू शकशील का?'' त्या तरुणाने काही उत्तर देण्याचा प्रयत्न केला पण त्यातील अपुरेपणा स्वामीजींनी त्याला दाखवून दिला त्यामुळे तो तरुण गोंधळून गेला.

त्याच्या मित्रांनी त्याला सावरून घेण्यासाठी काही उत्तरे दिली पण त्यातील चूकही प्रतिप्रश्न विचारून स्वामींजी लक्षात आणून दिली. मग ते सगळेजण गप्प झाल्यावर स्वामीजी त्यांना म्हणाले, ''मित्रांनो, तुम्ही रोज ऊर्जा वापरता, पण तरीही ऊर्जा म्हणजे काय, हे तुम्ही नीट सांगू शकत नाही आणि मी मात्र 'ईश्वर म्हणजे काय' ते सांगावे अशी तुमची अपेक्षा आहे !'' आणि मग स्वामीजींनी त्यांना ऊर्जा आणि ईश्वर या दोन्ही संकल्पना समजावून सांगितल्या. त्यांचे बोलणे ते विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. स्वामीजींची फजिती करण्यासाठी आलेले ते तरुण जाताना त्यांना गुरुस्थानी मानू लागले.

कथा उपदेश : ईश्वर आणि ऊर्जा अशा प्रत्यक्षात दिसत नसल्या तरी त्याचे आस्तित्व जाणवते.

## इतिहासात आजचा दिवस, २७ मार्च

अंतरराष्ट्रीय

२००० – वेस्ट इंडिजचा खेळाडू कोर्टनी वॉल्श याने कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळींचा विश्वविक्रम प्रस्थापित केला.

२००४ – 'नासा' या अमेरिकेच्या संशोधन संस्थेने एक्स–४३ या सर्वाधिक वेगवान चालकरहित जेट विमानाची निर्मिती केली.

२००७ – पूर्व चीनच्या च्यांगशी प्रांतात एका बाजारात लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला.

२००८ – श्रीलंकाने कॅरिबियन (वेस्टइंडीज) भूमीत पहिला कसोटी क्रिकेट सामना जिंकला.

राष्ट्रीय

१८९३ – केशवसुत यांनी 'तुतारी' लिहिली.

१९९२ – ख्यातनाम गायक पंडित भीमसेन जोशी यांना मध्य प्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार प्रदान

२००० – ज्येष्ठ चित्रपट निर्माता–चित्रपट दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांना फाय फाउंडेशनतर्फे राष्ट्रभूषण पुरस्कार जाहीर.

२००१ – लेफ्टनंट जनरल हरिप्रसाद यांनी फॉरवर्ड कॉर्प्सच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली.

२००७ – झारखंडमध्ये बस नदीत कोसळून ११ जण ठार झाले.

२००८ – राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त नंदलाल यांच्यावर दाखल करण्यात आलेला हक्कभंग प्रस्ताव विधानसभेत मंजूर झाला आणि त्यांना लगेचच अटक करण्यात आली.

जन्म

१८४५ – विल्हेम रॉंटजेन, जर्मन भौतिकशास्त्रज्ञ, क्ष–किरणांचा शोधक यांचा जन्म.

१९१९ – पुराणमतवादी मंत्री जुलीयन अमेरी यांचा जन्म.

१९३८ – रॉयल कॉलेज ऑफ पॅथोलोजिस्टसचे अध्यक्ष ए.जे. बलींग्हम यांचा जन्म.

निधन

१९६८ – युरी गागारीन, रशियाचा अंतराळवीर पहिला अंतराळवीर, तसेच पहिल्यांदा पृथ्वीप्रदक्षिणा करणारा अंतराळवीर याचे निधन.

१९९२ – मराठी साहित्यिक, गरवारे वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांचे निधन.

१९९७ – भार्गवराम आचरेकर, मराठी रंगभूमीवरील गायक व अभिनेता याचे निधन.

२००७ – बॉलीवुडचे प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक महेश भट्ट यांचे गुरु यू.जी.कृष्णमूर्ती यांचे निधन.

## त्यांच्या वाणीतून....

होळीच्या आनंदमय उत्सवानिमित्त मी सर्वांना माझ्या शुभेच्छा देतो.

परस्पर संबंध अधिक दृढ आणि स्नेहमय करणारा रंगांचा हा उत्सव वसंत ऋतूचे स्वागत करण्याचाही उत्सव आहे. हा सण, निसर्गाचे सौंदर्य आणि मानवी जीवनाच्या उत्सवाचे प्रतिक आहे. परस्परांशी असलेले मतभेद, दूर करून, नव्या चैतन्याने एकमेकांना भेटण्याची संधी हा उत्सव आपल्याला देतो.

होळीचे हे रंग, आपल्या सर्वांच्या आयुष्यात, आनंद, आशा आणि सौहार्द घेऊन येणारे ठरोत.

– उपराष्ट्रपती जगदीप धनखड

ज्याप्रमाणे दिल्ली ही राष्ट्रीय राजधानी आहे, मुंबई ही आर्थिक राजधानी आहे आणि बेंगळुरू ही तंत्रज्ञानाची राजधानी आहे, त्याचप्रमाणे लडाखची भूमी ही भारताच्या शौर्य आणि पराक्रमाची राजधानी आहे.

– संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

मविआने दिलेल्या जागा आम्ही परत करत असल्याचे ते म्हणाले. आम्हाला कुठे ना कुठे समाविष्ट करुन घ्याव असा त्यांचा विचार चाललाय. काही ठिकाणी मतभेद झाले आहेत. काँग्रेसने यादी जाहीर केली आहे. पण मतभेद असलेल्या मतदार संघाबद्दल काही झालं नाही. शिवसेनेही यादी जाहीर केली नाही.

– वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर

# या गोष्टी लक्षात ठेवा, जन्माला येणार नाही दिव्यांग मूल, तज्ज्ञांनी सांगितल्या काही टिप्स

गरोदरपणात महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक प्रकरणांमध्ये, खराब आरोग्याचा परिणाम देखील मुलावर होतो. पालकांच्या मनातही भीती असते की, आपले मूल काही आजार किंवा अपंगत्व घेऊन जन्माला येईल. अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून येते की मूल काही गंभीर आजार किंवा अपंगत्व घेऊन जन्माला येते. ज्यावर नंतर उपचार करता येत नाहीत. अनेक मुले आयुष्यभर आजारांशी झुंजत असतात.

अशा परिस्थितीत आज आम्ही तुम्हाला असे उपाय सांगत आहोत ज्याद्वारे तुमचे मूल निरोगी जन्माला येईल. हे जाणून घेण्यासाठी आम्ही तज्ज्ञांशी बोललो आहोत.

या ६ टिप्स फॉलो करा

अल्ट्रासाऊंड चाचणी करा

स्त्रीरोगतज्ज्ञ सांगतात की, गर्भधारणेदरम्यान अल्ट्रासाऊंड चाचणी करणे आवश्यक आहे. ही चाचणी किमान तीन वेळा करा. याद्वारे गर्भात वाढणाऱ्या बालकाच्या पोतबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. मुलाला काही समस्या असल्यास ते अगोदरच कळते आणि त्यावर वेळीच उपचार करता येतात.

अनुवांशिक चाचणी घ्या

जनुकीय चाचणी करून जनुकाशी संबंधित रोग आधीच ओळखता येतो. पालकांनी ही चाचणी करून घ्यावी. यामुळे कोणताही अनुवांशिक रोग ओळखला जातो. पालकांमध्ये कोणताही अनुवांशिक रोग असल्यास, त्याची वेळ ओळखली जाते. अशा परिस्थितीत, मुलाचे नियोजन करण्यापूर्वी या रोगांच्या उपचारांकडे लक्ष दिले जाऊ शकते.

अनुवांशिक चाचणी व्यतिरिक्त, अशा काही रक्त चाचण्या करणे आवश्यक आहे. यामध्ये ॲनिमिया, थॅलेसेमिया, थायरॉईडची पातळी, रक्तातील साखरेची पातळी आणि रुबेला विषाणूची समस्या तपासली पाहिजे.

निरोगी आहार

गरोदरपणात महिलांनी आपल्या आहाराची काळजी घ्यावी. सकस व पौष्टिक आहार घेतल्यास गरोदर माता आणि तिच्या पोटात वाढणारे मूल निरोगी राहते. महिलांनी दिवसभर पुरेशा प्रमाणात प्रथिने, फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्यांचे सेवन केले पाहिजे. तसेच पुरेसे पाणी पिणे चालू ठेवा. खाण्याकडे लक्ष दिल्याने रोगप्रतिकारशक्तीही मजबूत राहते आणि अनेक आजारांचा धोका कमी होतो.

मानसिक आरोग्याची काळजी घ्या

गरोदरपणात मानसिक आरोग्याचीही काळजी घेतली पाहिजे. तणाव, चिंता यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी तुम्ही रोज योग आणि ध्यान करू शकता. दररोज १० ते १५ मिनिटे योग आणि ध्यान केल्याने आरोग्यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होऊ शकते.

फॉलिक ॲसिड असलेले पदार्थ खा

गरोदरपणाच्या पहिल्या ३ महिन्यांत महिलांनी फॉलिक ॲसिडयुक्त पदार्थांचे सेवन सुरू करावे. यामुळे बालक आणि आईमध्ये अशक्तपणा होणार नाही आणि अनेक गुंतागुंत होण्याचा धोकाही कमी होईल.

# होळी साजरा करा. पण शत्रुत्व विसरा

होळीत शत्रुत्व विसरता येईल पण.......आम्ही तो विचार कधीच करीत नाही.आम्ही होळी खेळतो मनात शत्रुत्व ठेवून.जुन्या वैमनस्याचा बदला काढण्यासाठी आम्ही या होळीचा फायदा घेवून रक्तरंजीत होळी खेळत असतो आणि विसरत असतो होळी हा प्रेम वाढविण्याचा सण आहे.

होळी हा आनंदाचा सण आहे असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.आम्ही होळी हा सण साजरा करतो.त्याला हिंदूचा सण समजत त्यावर आपल्या धर्माचा हक्क जमवतो.तसंच पारंपारीक पद्धतीने विधीवत पूजा करुन आम्ही आमच्या धर्माचा प्रसारही एककल्ली स्वरुपात करीत असतो.

होळीला आपल्याला मजा वाटते ती रंग लावण्याची.मग तो ओळखीचा राहो अगर न राहो.काही मंडळी होळी खेळतांना अगदी वेगळ्या साधनांचा वापर करतात.रंग किंवा पाणी वापरण्याऐवजी अशी मंडळी चिखलाचा वापर करतात.नव्हे तर वेगवेगळे नकाबपोश करुन शत्रुत्वही काढत असतात.काही मंडळी अशा रंगात कमी प्रमाणात तेजाब टाकून चेहरा विद्रुपही करण्याचे काम करतात.जे आपल्याशी गोड गोड बोलतात,तेच अशा प्रकारचा घात करीत असतात.नाश्त्याच्या नावाने येणा–या डीशमध्ये उत्तेजक पेय टाकून काय काय करतात ते न सांगितलेले बरे.म्हणून होळी खेळतांना सावधान राहीलेले बरे.

मुळात हा सण हिंदूचा असला तरी या सणाची मजा सर्वच धर्मीयांना येत असते.ती मंडळी होळीची मजा घेत असतात.सर्व प्रकारची दुश्मनी विसरुन हा होलिकोत्सव साजरा केला जातो. हा सण जसा भारतात साजरा केला जातो,तसाच नेपाळमध्येही मोठ्या प्रमाणात साजरा होतो.या सणाचा महत्वाचा उद्देश शत्रुत्व मिटविणे हा आहे.पण आम्ही त्याचा उलट अर्थ घेवून आपले असलेले पुरातन शत्रुत्व......त्या शत्रुत्वाचा बदला काढत असतो.हा सण फाल्गून महिण्यात येतो. पंचमीला पंचमोत्सव साजरा केला जातो.

पुर्वी हा उत्सव आर्यामध्ये प्रचलित होता.अल्बेरुनी हा प्राचीन मुस्लीम पर्यटक.या मुस्लीम पर्यटकाने लिहिलेल्या आपल्या ग्रंथात होळीचे महत्व वर्णन केले आहे.तसेच मुस्लीमांच्याही काळात होळी हा सण साजरा करीत असल्याचे पुरावे मिळतात.बादशाह अकबर आपली राणी जोधाबाईसोबत नेहमी होळी खेळत होता.तसेच जहाँगीर बादशाह आपल्या नुरजहाँसोबत होळी खेळल्याचा उल्लेख अलवर संग्रहालयात आहे.अलवर येथील एका संग्रहालयातील चित्रात शहाजहान बादशाहाने या सणाला ईद ए गुलाबी आणि धुलीवंदनला आब ए पाशी(रंगाचा पाऊस) म्हटलेले दाखवले आहे.नव्हे तर बहाद्दूरशहा जफर जो मुस्लीमांचा शेवटचा शासक झाला,त्याला रंग लावायला संपुर्ण मंत्रीमंडळ जायचं.यावरुन हे दिसते की होळी हा केवळ हिंदूपुरता मर्यादीत नव्हता.

काळ बदलला.इंग्रज आले.त्यांनी भारतीय सुत्रे हातात घेतली.नंतर त्यांनी हळूहळू या देशात फुट पाडण्याचा विचार करीत येथील हिंदू मुस्लीमांना भडकविले.मग भारतीय मुस्लीमांनी हेच सणं साजरे करावे तसेच हिंदूने हेच सण साजरे करावे आणि ते का करावे हे सांगून या सणातही फूट पाडण्याचा प्रयत्न केला.कारण त्यांना राज्य करायचे होते.त्यांना वाटत होते की ही मंडळी जर आपापसात भांडत असली तरच आपल्याला राज्य करता येईल. हा त्यांचा उद्देश आम्ही भारतीय समजू शकलो नाही.आज इंग्रज गेले तरी समजून घेत नाही.भेदभाव करीत असतो.आपापसातच भांडत असतो.कधी कधी सणावरुनही भांडतो.

ज्याप्रमाणे मुस्लीम राजे हे होळी सण साजरा करीत.त्याप्रमाणे हिंदी राजेही होळी सण साजरा करीत.इसवी सणाच्या सोळाव्या शताब्दीत विजयनगरच्या हंपी राजधानीत तसेच मेवाडचा राजा महाराणा प्रताप हाही होळी खेळत असल्याचे चित्र मेवाडच्या एका चित्रप्रदर्शनीत लागले आहे.

या सणाला प्राचीन ऐतिहासीक पाश्वभुमीही लाभली आहे.जसे पुतना राक्षसीनीचा वध केल्यानंतर गोकुळात रंग खेळून आनंदोत्सव साजरा केला गेला.तो होळी सणच होय.तसेच शिवाच्या लग्नाची वरातही अशीच रंग खेळत निघाली होती.म्हणून आज त्याची आठवण म्हणून होळी खेळतांना शिवासारखे मोठे केस परीधान केले जातात.किंवा मुखवटे लावले जातात.तसेच मुख्य म्हणजे होळीचा संबंध भक्त प्रल्हाद आणि होलिकेशीही लावला जातो.अर्थात आपला भाऊ हिरण्याक्षला विष्णूने मारल्यामुळे हिरण्यकश्यपू श्रीहरीविष्णूचा भयंकर राग करायचा.पण त्याच्या पोटी जन्माला आलेला मुलगा प्रल्हाद सतत विष्णूचे नाव जपत राहायचा.त्या विष्णूचा राग मनात असल्यामुळे आपल्या पुत्राला मारण्यासाठी आपल्या बहिणीला होलिकेला शरणात बसायला लावले.त्यातच होलिका दहन झाली आणि प्रल्हाद सुखरुप वाचले.

होळी पेटविणे म्हणजे याचा अर्थ दृष्ट प्रवृत्तीचे दहन करणे होय.आपल्या मनातील राग,लोभ, द्वेष ,मध,मत्सराचे दहन करुन चांगले सात्वीक बनणे.याच दृष्टिकोणातून होळीचे महत्व आहे.याच अर्थाने आम्ही दरवर्षी होळी हा सण साजरा करायला हवा.होळीला जास्त भडक रंगाचा वापर न करता फक्त गुलालाचा टिळा लावून गळाभेट घेवून हा सण साजरा करावा.पण आम्ही हा सण साजरा करतांना मनात एक व ओठात एक ठेवतो.गळाभेट घेतांना आमच्यातला अफजलखान जागा होतो आणि आमच्या शिवाजीला कल्पना येण्याआधीच आमचा शिवाजी कट्यारीने मारला जातो.सकाळी फागवा काढून पैसे गोळा केले जातात.आलेल्या पैशाने सायंकाळी एकतर जुवा खेळला जातो वा दारू ढोसली जाते.मग आमच्या डोक्यात शैतानी विचार शिरतात.कोणीचा गेम करायचा याचे मनसुबे आखले जातात.सकाळी देखील चेह–यावर चेहरा ओळखू न येणारा रंग लावून जुन्या शत्रूत्वाचा बदला काढण्यासाठी चाकूने वार केला जातो.नंतर पळ काढला जातो. कोणी हे कृत्य केले ते लक्षातही येत नाही.वा अँसीडही फेकले जाते प्रेयसीवर.एकतर्फी प्रेमातून होळीचा फायदा घेवून तु मेरी नही तो किसीकी भी नही।असे म्हणत चेहरा विद्रुप केला जातो.

कोणतेही सण साजरे करणे ही आपली परंपरा जरी असली तरी त्या सणाला कधीच गालबोट लावण्याचा प्रयत्न करु नये.बदला घेणे ही आपली राक्षसी वृत्ती आहे.ती या होळीच्या निमीत्यानं सोडावी.राग,लोभ,द्वेषाला होळीत जाळून टाकावे.जुनं वैमनस्य विसरुन होळी खेळावी. आनंद घ्यावा.शेअरही करावा.पण त्यात कोणी दुखावला जाईल अशा प्रकारची होळी खेळू नका. होळीला गालबोट लावण्याचा प्रयत्न करु नका.

**अंकुश शिंगाडे**
**९३७३३५९४५०**

## साप्ताहिक राशिभविष्य
## दि. २७ मार्च २०२४ ते ३० मार्च २०२४

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण

समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

वृषभ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर

शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा.

मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व

महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण

फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर

मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

कन्या : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर

कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

तुळ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व

मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर

अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

धनु : शुभ रंग:निळा,शुभ दिशा:दक्षिण

आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

मकर: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर

कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शयता असून उपन व खच बरोबरीने राहील.

कुंभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व

सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

मीन : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व

शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

२७ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, नेपच्यून आणि मंगळाचा दुहेरी प्रभाव आहे. तुम्ही मनाने हळवे आहात. इतरांबल तुमच्या मनात खूप सहानुभूती असते. त्यांची दु:खे दूर करण्यासाठी तुम्ही सतत प्रयत्न करता. सत्ता व अधिकार उपभोगण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशी तुमची धारणा असते. तुमचा आत्मविश्वास कधी कमी होत नाही. शत्रूबाबत कारस्थाने करणे तुम्हाला आवडत नाही. समोरासमोर लढत द्यायला तुम्हाला आवडते. त्यामुळेच ज्युडो, कराटे वगैरे खेळात तुम्ही रस घेता. तंत्रनैपुण्यही, सहज प्राप्त करून घेऊ शकता.

फाजील आत्मविश्वासाने पेलता येणार नाही असे आव्हान स्वीकारू नका. आपल्या पदावरच कार्यक्षमता उंचावून दाखवा. संताप, शीघ्रकोपीपणा यामुळे डोकेदुखी, उ रक्तदाब, अल्सर सारखे विकार निर्माण होतील. मनाचा समतोल कायम ठेवा.

कार्यक्षेत्र : कुणाच्या हाताखाली काम करायला तुम्हाला आवडत नाही. तुमचा व्यवसाय स्वतंत्र एकट्याने करावे असे तुम्हाला वाटते. पण त्यासाठी अनुभव मिळवण्यासाठी यंत्रशाळा, कारखाने, यंत्रसामुग्रीची रचना व प्रस्थापना वगैरे क्षेत्रात काम करणे आवश्यक आहे. तांत्रिक निपुणता अंगी असल्याने अभियांत्रिकीच्या सर्वच शाखा व त्यातल्या त्यात इंधने, ऊर्जा, ऑटोमोबाइल्स, वीज क्षेत्रात शिरकाव करून घेऊ शकाल व उत्कर्षही करून घ्याल.

प्रणयी जीवन : स्वभाव उतावळा असल्याने तुम्ही आपली प्रेमभावना व्यक्त करून मोकळे होता. पण त्यात प्रेमभंगाची शयता अधिक असते. इतरानी आपल्यावर वर्चस्व गाजवणे मान्य नसल्याने २१ मार्च ते २० एप्रिल दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती टाळा. शारीरिक आकर्षक, सुंदर व्यक्तिमत्व हवे असल्याने २१ एप्रिल ते २० मे दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती तुमच्या प्रीतीला प्रतिसाद देतील.

वर्षफळ : बऱ्याचशा कामात यश मिळाल्याने आत्मविश्वास कायम राहील. नवी आव्हाने स्वीकारून ती यशस्वी करून दाखवाल. जानेवारी फेबुवारी मध्ये नव्या जागा खरेदीचे व्यवहार करण्यास हरकत नाही. एप्रिल मे मध्ये स्वतंत्र वा भागीदारीत व्यवसाय करण्यास अनुकूल गहमान लाभेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये राजकीय क्षेत्रात घणाघाती वकृत्वामुळे, आक्रमक धोरणाने आघाडीवर रहाल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये विदेशी कंपन्यासाठी काम करण्याची संधी मिळेल.

महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२, ८१.

भाग्यरत्न : पोवळे

याच तारेखेची व्यक्ती : सिमा देव

## जयक्रांती महाविद्यालयातील अविनाश शेल्लाळे (NIC) राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभाग

लातूर : येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील बीएससी प्रथम वर्षात शिकत असलेला अविनाश शिवाजी शेल्लाळे या विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय एकात्मता शिबीर सेंट्रल यूनिवर्सिटी, केरळा कासरगोड येथे दिनांक १६ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत छ्खउ राष्ट्रीय एकात्मता शिबीर संपन्न झाले. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणारा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड चा संघ सहभागी झाला होता. संघामध्ये जयक्रांती महाविद्यालयातील अविनाश शेल्लाळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट कार्य केले सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कार्यक्रमांमध्ये त्याचा सहभाग अतिशय सक्रिय होता. या शिबिरामध्ये या संघास उत्कृष्ट संघ म्हणून सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मलिकार्जुन करजगी, संघ व्यवस्थापक डॉ. सोमनाथ बिराजदार, संस्थेचे सचिव प्रा गोविंदराव घार, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. संभाजी जाधव, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. केशव अलगुले, कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. रामेश्र्वर स्वामी, प्रा. शिवराज बाजुळगे, प्रा. विश्र्वेश बेटकर, श्री जाधव रामदास यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास शिबीरात सहभागी झालेल्या पवार शितल संजय, खुणे सांची विलासराव, निलंगे माधवी नवनाथ, निलंगेकर श्रद्धा राजरतन या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

## हिमायतनगर शहरात दुचाकी चोरांची टोळी सक्रिय : दोन दुचाकी चोरट्यांनी पळविल्या

हिमायतनगर – शहरातील जुन्या बँकेसमोरुन दि १८ मार्च रोजी २:३० ते ३:१५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दुचाकी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. याबद्दल हिमायतनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तालुक्यात दुचाकी चोरांची टोळी सक्रिय झाल्यामुळे संबंध हिमायतनगर तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.

हिमायतनगर शहरातील परमेश्र्वर मंदिरासमोरून मुख्य चौकातूनच दोन्ही दुचाकी चोरी गेल्याने पोलीस प्रशासनाच्या हातावर तुरी देत चोरांनी दुचाकी चोरल्या आहेत.सामान्य नागरिकांसह आता पत्रकारांचीही दुचाकी चोरी गेल्याने नागरिकातुन आश्र्चर्य व्यक्त केल्या जातं आहे. पोलीस प्रशासन या बाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून त्या चोरट्याचा शोध लावण्यात यशस्वी होतील का? हे तपासाची चक्रे जलद गतीने फिरविल्याशिवाय कळणारच नाही.

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम येथील रहिवासी राजरतन वाठोरे हे हिमायतनगर येथे कामानिमित्त व येथे सुरू असलेल्या यात्रेला गेले असता येथील जुन्या बँकेसमोर एम एच २६ ए एक्स ८७५० नंबरची हिरो कंपनीची स्प्लेंडर दुचाकी २:३० वाजता लावून यात्रेत फिरायला गेले व परत ३:१५ वाजता गावाकडे जाण्यासाठी जुन्या बँकेसमोर येवून पाहिल्यावर सोडलेल्या जागेवर दुचाकी दिसत नसल्याने आजुबाजुला चौकशी केली परंतु दुचाकी सापडत नसल्यामुळे हिमायतनगर पोलीस स्टेशनला जाऊन दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर हिमायतनगर पोलीस स्टेशन येथुन कळाले की सदर ठिकाणी वरुन त्याच दिवशी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास हिमायतनगर येथील रहिवासी शेख जमीर शेख महेबुब यांची ही एम एच २६ बी जे ४६१४ नंबर ची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस दुचाकी ही चोरट्यांनी चोरुन नेली.असे एकाच दिवशी हिमायतनगर शहरातुन अज्ञात चोरट्यांनी दोन दुचाक्या चोरुन नेल्याची घटना घडली आहे.हिमायतनगर पोलीस ठाण्यात विजय नारायण वाठोरे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र दुचाकी चोरट्यांना पकडण्यासाठी येथील पोलिसांना यश मिळणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असुन पोलिसांनी लवकरात लवकर चोरट्यांचा शोध लावुन तालुक्यातील संपूर्ण चोरट्यावर आळा घालण्याची मागणी विजय वाठोरे यांच्यासह जनतेतून केली जात आहे.

हिमायतनगर पोलीस स्टेशन हद्दीत पोलीसांच्या नाका खाली अनेक प्रकारच्या अवैध धंदे दारू मटका जुगार गुटखा अश्या अनेक अवैध धंद्यानी जोर धरला असल्याचे चित्र शहरासह संपूर्ण तालुक्यात पाहायला मिळत आहे. परंतु नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक यांनी पदभार सांभाळल्या पासुन अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याचे पाहायला मिळत नसल्यामुळे हिमायतनगर तालुक्यात सध्या अवैध धंद्यासोबतचा चोरट्यांनीही जोर धरला आहे.

## झाडांना टँकरद्वारे पाणी देऊन वृक्ष संवर्धन उपक्रम



लातूर : होळी निमित्ताने झाडे तोडू नका, पवित्र अशा होळीमध्ये प्लास्टिक, टायर जाळून प्रदूषण करू नका हा संदेश देत ग्रीन लातूर वृक्ष टीमने काल रविवारी अद्भुत, अविस्मरणीय, अविश्र्वसनीय असे कार्य संपन्न केले.

महात्मा गांधी चौक ते संविधान चौक ते शहीद भगतसिंग चौक ते नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज ते रेल्वे उड्डाणपूल बार्शी रस्ता असा १२ किलोमीटर अंतरावरील सगळ्या झाडांना, रस्ता दुतर्फा झाडांना रस्ता दुभाजकातील झाडांना, ९-१० हजार लहान मोठी झाडे, हो झाडून पुसून सगळ्या झाडांना अकरा टँकरद्वारे सलग साडेचार तास श्रमदान करत, सलग साडेचार तास टँकरच्या पाठीमागे पाईप हातात घेऊन झाडांना पाणी देण्याचं अवघड कार्य ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सदस्यांनी पूर्ण केलं.

याचा सर्वांनी आदर्श घ्यायला पाहिजे. उन्हाळ्यामुळे तापमान वाढत आहे जमिनीतील उष्णता वाढत आहे झाडांना जगण्यासाठी पाण्याची गरज आहे आणि त्यांना पाणी कमी पडून झाड कोमजली जात आहेत. लातूर शहरात झाडांना पाणी देण्यासाठी प्रशासनाची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे शहरातील एक अन एक झाड जगविण्यासाठी ग्रीन लातूर वृक्ष टीमचे सदस्य जीवापाड मेहनत आणि जे कष्ट घेत आहेत.

यावेळी लातूरकरांनीही आपल्या परिसरातील झाडे जगवा आणि येता उन्हाळा सर्वांसाठी सुसह्य करा ही आग्रहाची, कळकळीची नम्र विनंती करण्यात आली. यावेळी ग्रीन लातुर वृक्ष टीमचे ४० महिला पुरुष सदस्य झाडांना पाणी देण्यासाठी श्रमदान करत होते. गेल्या १७५९ दिवसापासून अविरतपणे ग्रीन लातूर वृक्ष टीमचे लातूर जिल्ह्यामध्ये वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाचे कार्य सुरू आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक हरमन स्टॉडिंगर यांची जयंती साजरी

लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२३ मार्च २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक वॉल्टर हरमन स्टॉडिंगर १४३ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो.विभागातील प्रा.अवंती बिडकर, डॉ.फिरदोस बिरादार, प्रा.श्र्वेता मदने व प्रा.श्रीनिवास कुलकर्णी यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले.वैज्ञानिक हरमन स्टॉडिंगर यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.प्रथम वर्षाची विद्यार्थीनी पर्णवी ढवारे यांनी सांगितली.

हर्मन स्टॉडिंगर हे एक जर्मन सेंद्रिय रसायनशास्त्रज्ञ होते,ज्यांनी मॅक्रोमोलेक्यूल्सचे अस्तित्व दाखवून दिले.ज्याचे त्यांनी पॉलिमर म्हणून वैशिष्ट्यीकृत केले. या कार्यासाठी त्यांना १९५३ चे रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले.ते केटीन्सचा शोध आणि स्टॉडिंगर प्रतिक्रिया यासाठी देखील ओळखला जातात. स्टॉडिंगर, लिओपोल्ड रुझिका यांच्यासमवेत १९२० च्या दशकात पायरेथ्रिन आण्विक संरचना देखील स्पष्ट केल्या. ज्यामुळे १९६० आणि १९७० च्या दशकात पायरेथ्रॉइड कीटकनाशकांचा विकास सक्षम झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे पदाधिकारी विद्यार्थी तसेच विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# खरोसा गटातील कॉंग्रेसचे तगडे कार्यकर्ते विश्र्वास काळे यांचा भाजप प्रवेश...



औसा – आमदार अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखालील औसा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीसह विविध पक्ष व संघटनेतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने भाजप पक्षात प्रवेश करीत असून खरोसा गटातील कॉंग्रेसचे तगडे कार्यकर्ते विश्र्वास काळे यांनीही शनिवारी आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला.याप्रसंगी भाजप चे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, औसा शहर अध्यक्ष सुनिल उटगे, संतोष बेंबडे, किल्लारी कारखान्याचे माजी संचालक युवराज बिराजदार, उन्मेष वागधरे,कार्ला सरपंच श्री काळे, सुधीर पाटील आदी उपस्थित होते.

खरोसा गटातील कॉंग्रेसचे तगडे कार्यकर्ते माजी सरपंच विश्र्वास काळे यांनी भाजप पक्षात प्रवेश घेतला आहे. काळे यांनी आपल्या जनसंपर्क व राजकिय ताकदीच्या जोरावर पत्नी राजश्री काळे यांना औसा पंचायत समितीच्या उपसभापती म्हणून काम करण्याची संधी मिळवून दिली होती. त्यांचा मोठा जनसंपर्क असून त्याचा मोठा फायदा या गटात भाजप पक्षाला होणार आहे. एकंदरीत मतदारसंघात आमदार अभिमन्यू पवार यांच्या विकास कामावर विश्र्वास ठेवत मोठ्या प्रमाणात भाजप पक्षात इनकमिंग होताना दिसत आहे.

## धाराशिव लोकसभा मतदार संघासाठीचा खासदार निधी विविध विकास कामावर १००% खर्च – ओम राजेनिंबाळकर

शाराशिव – मी सन २०१९ ते २०२४ या काळात धाराशिव लोकसभा मतदार संघाचा लोकसभा सदस्य म्हणून जनतेच्या आर्शीवादाने सेवा करण्याची संधी मिळाली. माझ्या लोकसभा मतदार संघात १५ मोठी शहरे असून लहानमोठी अशी जवळपास १४०० गावे येतात व या शहरात व ग्रामीण अनेक ठिकाणी विकास कामाची मागणी येत आहे. लोकसभा सदस्यासाठी प्रत्येक वर्षी खासदार निधी ५ कोटी असतो, धाराशिव लोकसभा मतदार संघाच्या विविध विकास कामाच्या प्रतीवर्ष ५ कोटी प्रमाणे ५ वर्षाचा खासदार निधी रुपये २५ कोटी येणे आवश्यक होते. मात्र मला मतदार संघातील विविध विकास कामासाठी केवळ १७ कोटी २२ लक्ष एवढा निधी प्राप्त झाला त्यापैकी मला कोराना काळातील २०२०-२१ या वर्षातील ५ कोटी व २०२१-२२ या वर्षातील ३ कोटी असे एकुन ८ कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला नाही. मतदार संघातील गावाची संख्या पाहता व सर्व सामान्य नागरीकांच्या विविध विकास कामासाठी असलेली मागणी याचा विचार करता अनेक विकास कामे करण्यास निधीची कमतरता जाणवली आहे.

तसेच मतदार संघातील अनेक विकास कामे ही करण्यासाठी खासदार निधीची कमतरता भासल्याने रस्त्याची व अनेक मतदारांच्या हिताची विकास कामे ही जिल्हा परीषद, बांधकाम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मृद व जलसंधारण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे, क्रीडाधिकारी कार्यालय तसेच शासनाच्या अनेक खात्यामार्फत मी शिफारस करुन पुर्ण केलेले आहेत. याचा देखील सविस्तर अहवाल व माहिती आपल्याला कळवण्यात येईल.खासदार निधीच्या खर्चाबाबत प्रत्येक कामनिहाय व निधी निहाय माहिती ही प्रसिध्द केली आहे.

# महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात श्रीकांत आनंदराव अनमूलवाड यांचा सत्कार

लातूर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयातील बी. एस्सी. तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्रीकांत आनंदराव अनमूलवाड हा आयआयटी जाम या परीक्षेमध्ये नुकताच उत्तीर्ण झाला आहे. त्याचा सत्कार प्राचार्य कक्षामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. दीपक चाटे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, डॉ. जितेंद्र देशमुख आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

श्रीकांत आनंदराव अनमूलवाड हा विद्यार्थी कापरवाडी ता. मुखेड जि. नांदेड येथील रहिवासी असून त्याचे वडील शेतकरी आणि आई गृहिणी आहे. त्याची कौटुंबिक परिस्थिती सर्वसाधारण असूनही त्याने अतिशय कठीण असलेली आयआयटी जाम ही परीक्षा पहिल्याच प्रयत्नामध्ये उत्तीर्ण केली. यामुळे त्याला आयआयटीमध्ये प्रवेश मिळणे सहज शक्य झाले आहे तो सुरुवातीपासूनच अभ्यासू आणि चिकित्सक विद्यार्थी आहे आणि त्याला रसायनशास्त्र विषयांमध्ये अधिक रुची आहे. त्याला रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी आणि डॉ. जितेंद्र देशमुख यांचे सतत मार्गदर्शन लाभले.

त्याच्या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व इतर सर्व संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शाखा समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# लातूर शहर मतदारसंघातील २७ गावातील बुथ प्रमुखांची अमित देशमूख यानी घेतली बैठक

प्रतिनिधी :लातूर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी कॉंग्रेसकडून डॉ. शिवाजी काळगेयांना अधिकृत उमेदवारी मिळाली आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षणसांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमितविलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. २६ मार्च रोजी सकाळी बाभळगावनिवासस्थानी लातूर शहर मतदारसंघातील बाभळगाव, महापूर, हनमंतवाडी,कातपुर, गंगापूर, वासनगाव पाखर सांगवी, शिरसी आदी सत्तावीस गावातील बूथप्रमुखांची बैठक घेऊन लातूर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या कामालालागावे, अशा सूचना केल्या आहेत.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे, विलासको-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, लातूर तालुका कॉंग्रेसचेअध्यक्ष सुभाष घोडके, सचिन बंडापल्ले, गणेश एसआर देशमुख, तानाजी फुटाणेपंडित ढमाले, रघुनाथ शिंदे, डॉ. सतीश कानडे, गोविंद देशमुख, प्रताप पाटील संजय निलेगावकर आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी लातूर शहर मतदारसंघातील २७ ावातील विविध पदाधिकारी सर्व बूथ प्रमुख उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र प्रदेशकॉंग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे यांनी बुथ प्रमुखांना दिलेल्या सर्वसूचना अमलात आणाव्यात असे सांगून बुथनिहाय कामाचे नियोजन करण्याच्यासुचना दिल्या. पुढे बोलताना ते म्हणाले की ही निवडणूक म्हणजे वैचारिक युद्ध आहे हे विचारानेच लढावे लागेल, डोअर टू डोअर कॅम्पेन दोन वेळाकरावे ते करताना पहिल्या टप्प्यात जाहीरनामा, उमेदवाराचा परिचय पत्रमतदारांना द्याव, दुसऱ्या टप्प्यात पोलचिट द्यावी. लातूर कॉंग्रेसचाबालेकिल्ला राहिला आहे लोक आग्रहातून सुसंस्कृत सुप्रसिद्ध नेत्रतज्ञडॉक्टर शिवाजी काळगे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. लोकसभा नंतरविधानसभा त्यानंतर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका आहेत याक्षणापासून प्रत्येकाने कामाला लागावे प्रत्येकाने प्रचारासाठी मेहनतघ्यावी लढून आपल्याला जिंकायचे आहे. देशात राज्यात जिल्ह्यातीलमुद्द्यावर लोकसभा निवडणुका होतील, पण कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीहीमतदारांच्या दारापर्यंत जावे लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठीयोग्य व्यक्ती लोकसभेत गेली पाहिजे असे सांगून त्यांना सर्वबूथप्रमुखांना पुढील कामासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.



**आ. अमित देशमूख कार्यकर्त्यांना सुचना करत असतानाच बाजूला बसलेले जेष्ठ नेते समत पटेल, तरुण नेते सचिन बंड्डापल्ले, आपापसात चर्चा करत असताना दिसत असून, असं पहिल कधी घडलेल नव्हत, ते पाहायाला मिळत आहे.**

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे म्हणाले की, गावपातळीवर ग्रामपंचायत निवडणुकीत ज्याप्रमाणे आपण नियोजन करतो त्याप्रमाणेनियोजन लोकसभा निवडणुकीत बूथप्रमुखांनी करावे या निवडणुकीचे व्यवस्थापनकरणे गरजेचे आहे. यावेळी डॉ.सतीश कानडे, विलासराव देशमुख युवा मंचचेलातूर शहराध्यक्ष विजय टाकेकर, माजी नगरसेवक आसिफ बागवान यांनी मनोगतव्यक्त केले, तर या बैठकीचे शेवटी आभार लातूर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्षसुभाष घोडके यांनी मानले.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्रावरील तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग व इंडियन अकादमी ऑफ सायन्सेस,बेंगळुरू,भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी,नवी दिल्ली आणि राष्ट्रीय विज्ञान अकादमी,प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ ते २८ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ' विज्ञान अकादमीच्या भौतिकशास्त्रावरील तीन दिवसीय व्याख्यान कार्यशाळे ' चे उद्घाटन झाले.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पॉंडेचरी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.अनिल के.भटनागर,कार्यशाळा समन्वयक माजी प्राचार्य आर.एच.लड्डा,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी,कार्यशाळा सहसमन्वयक व इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी.एच.मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.अनिल के.भटनागर यांनी विद्यार्थ्यांना क्टिव्ह राहून विविधांगी गुण आत्मसात करून नवनवीन क्षेत्रात भरारी घेण्यास प्रोत्साहित केले तसेच नियमित अभ्यासक्रमात अशा कार्यशाळेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे असे सांगून या कार्यशाळेचे महत्त्व आणि भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या विविध घटकांवरती चर्चा केली.भविष्यात स्ट्रोफिजिक्स,आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या नवनवीन विषयावरती देखील कार्यशाळा घेण्यात याव्यात असे आवाहनही त्यांनी केले.

## महाविकास आघाडी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार डा.शिवाजी काळगे यांना लातूर लोकसभा मतदारसंघात उत्स्फूर्त प्रतिसाद.

लातुर प्रतिनिधी– लातुर लोकसभा मतदारसंघात



महाविकस आघाडी कॉंग्रेस पक्षाकडून स्वच्छ प्रतिमा असलेले,उच्च शिक्षित,नेत्रतज्ञ डॉ.शिवाजी बंडप्पा काळगे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी लातुर लोकसभा मतदार संघात आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार यांच्या भेटीगाठी सुरू केल्या असून मतदान संघासह पंचक्रोशीतील नागरिक डॉ. शिवाजी काळगे यांचे उत्स्फूर्त स्वागत करीत त्यांची मिरवणूक काढून मतदानरुपी आशीर्वाद देत प्रचंड मताधिक्क्याने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त करीत आहेत.

लातुर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील राणी अंकुलगा गावचे डॉ.शिवाजी बंडापा काळगे यांची जन्मभूमी व कर्मभूमी दोन्ही लातुर असून त्यांचे उच्च शिक्षण,वैद्यकीय क्षेत्रातील कार्य,दांडगा जनसंपर्क, मितभाषी स्वभाव या बाबींचा विचार करून कॉंग्रेस पक्षाने इंडिया (महाविकास) आघाडी चे अधिकृत उमेदवार म्हणून डॉ. शिवाजी काळगे यांचे नाव घोषित केले आणि या घोषणेनंतर जिल्ह्यात सर्वच स्तरातून आनंद आणि पक्षाने दिलेल्या योग्य उमेदवारी बद्दल समाधान व्यक्त केले जाते आहे. लातुर शहरातील विविध भागात तसेच त्यांचे मूळ गाव असलेल्या राणी अंकुलगा गावातील त्यांचा मित्रपरिवार,नातेवाईक यांच्यासह मतदार संघातील नागरिकांनी या निवडीचे स्वागत करीत आनंद देखील साजरा केला आहे.

अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष आणि नेतृत्वाने लातुर लोकभेसाठी उमेदवारी जाहीर करताच लातूरचे सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.शिवाजी काळगे यांनी मुळ गाव राणी अंकुलगा, शिरूर अनंतपाळ तालुक्यासह जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक , व्यापारी, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर यासह शहर व जिल्ह्यातील ठिकाणी भेटीगाठी सुरू केल्या आहेत या भेटीगाठी दरम्यान त्यांचे जागोजागी उत्स्फूर्त स्वागत केले जात आहे.

नुकतेच इंडिया (महाविकास) आघाडी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांनी राणी अंकुलगा गावी जाऊन गावातील लोकांशी संवाद साधत ग्रामदेवताचे दर्शन घेतले. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बाकली,बसपूर,घुगी,वळसंगी येथील लहान थोर मंडळी, ग्रामस्थ मंडळीनी त्यांची गावात भेट घेऊन विजयाचा विश्र्वास डॉ.शिवाजी काळगे यांना देत गावातून मिरवणूक काढली. यासोबत उदगीर येथील ग्रामदैवत उदागीर बाबा यांचे दर्शन घेतले यासोबतच उदगीर मधील अनेकांच्या घरी सदिच्छा भेट दिली. यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी अण्णा हुडे,प्रदेश सरचिटणीस राजेश्र्वरजी निटूरे सावकार,कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याणजी पाटील, महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस उषाताई कांबळे,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर,शिवसेनेचे तालुकाप्रमुख चंद्रकांत टेंगेटोल,शहरप्रमुख पंचाक्षरी,अजित शिंदे तसेच देगलूर रोड येथील स्वामी सर यांच्या घरी सदिच्छा भेट दिली.या गाठीभेटी दरम्यान उदगीरातील डॉ.रमण रेड्डी, डॉ.बाळासाहेब पाटील,डॉ.दत्ता पाटील, डॉ.तानाजी मोरे, डॉ. बिरादार उपस्थित होते.

तर आज रविवार दि.२४ मार्च रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी जाऊन लातुर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांची पक्ष पदाधिकारी यांच्या समवेत भेट घेतली यावेळी आमदार धीरज देशमुख यांनी डॉ.शिवाजी काळगे यांना शुभेच्छा दिल्या. यानंतर त्यांनी मनपाचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांचीही शहरातील मंठाळे नगर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली, नंतर लातुर तालुक्यातील चिकलठाणा येथे जाऊन तेथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांचे पदाधिकार्याची भेट घेतली यावेळी त्र्यंबक स्वामी यांनी त्यांचे स्वागत करून उमेदवारी बद्दल शुभेच्छा देत ग्रामीण भागात मताधिक्य मिळण्यासाठी संपूर्ण प्रयत्न केले जातील असे त्यांना यावेळी आश्र्वस्त केले.

प्रतिष्ठित व्यक्ती, मान्यवर यांच्या या भेटीनंतर सर्व त्यांना प्रचंड मताधिकय्याने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त करीत आहेत. डॉ.शिवाजी काळगे यांना उमेदवारी जाहीर केल्याने कॉंग्रेस पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नव चैतन्य निर्माण झाले आसून त्यांच्या ठिकठिकाणी छोटेखानी मिरवणुका,कौटुंबिक व मित्रपरिवारा कडून स्वागत समारंभ कार्यक्रम केले जात आहेत.

लातुर लोकसभा मतदार संघ हा पुन्हा एकदा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला व्हावा यासाठी कॉंग्रेस, पदाधिकारी, कार्यकर्ते नव्या जोमाने नव्या उमेदीने डॉ.शिवाजी काळगे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर कामाला लागले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मागील पाच वर्षात विद्यमान भाजप खासदाराने शेतकरी, युवक,महिला भगिनी यांच्यासाठी ठोस अशी कुठल्याही प्रकारची कामे, मतदार संघातील इतर विकास कामे केली नाहीत यामुळे वरील सर्व समाज घटकांशी संपर्क असलेल्या डॉ. शिवाजी काळगे यांच्या उमेदवारीमुळे मतदार संघातील मतदार नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या असून प्रत्येक ठिकाणी नागरिक त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करून या निवडणुकीत त्यांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन प्रचंड मतांनी निवडून आणण्याची ग्वाही देत आहेत आणि असे झाल्यास लातुर हा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट होईल.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९७ व्या जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी माझं लातूर परिवाराचे उमेश अंबादास कांबळे यांची निवड



लातूर : – डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९७ व्या जयंती साजरी करण्यासंदर्भात आयोजित बैठकीत यावर्षी वैचारिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी जयंती साजरी करण्याचे ठरले. याप्रसंगी जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी माझं लातूर परिवाराचे उमेश कांबळे, कार्याध्यक्षपदी राम बुरबुरे, स्वागताध्यक्षपदी भारत काळे, सचिवपदी बाळासाहेब फासे, कोषाध्यक्ष पदी तुलसीदास गोंदकर, सह कोषाध्यक्ष म्हणून संतोष माळी तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून डी.उमाकांत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

बैठकीस गतवर्षीचे अध्यक्ष सचिन गायकवाड, ड.गोपाळ बुरबुरे, पद्माकर वाघमारे सर, ड.बालाजी गाडेकर, प्रज्वल उबाळे, रणजित आचार्य, पांडुरंग माळी, नागनाथ पोलकर, सुरेंद्र तिडके, अक्षय हालके, किशोर माळी, संतोष माळी, डी.के माळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894